साप्ताहिक

# दर्शक

E-mail : weeklydarshak.gmail.com R.N.I.NO.MAH/MAR/2000/02266

वर्ष ३६ अंक ४ सोमवार ७ सप्टेंबर ते रविवार १३ सप्टेंबर २०२० किंमत रु.२

## संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन के.के.रेंज विस्तीरकरणाचा प्रश्न मार्गी लावू : शरद पवार

अहमदनगर (पारनेर) । अहमदनगर जिल्ह्यात तीन तालुक्यात के.के. रेंज विस्तारी करणाच्या मोठ्या प्रमाणात हालचाली सुरू झाल्या आहेत. दरम्यान आपल्या पिकत्या जमिनी विस्तारीकरणासाठी देण्यात शेतकऱ्यांनी मनाई केली आहे. याविरोधात सर्व गावकरी एकवटले आहेत.या पार्श्वभूमीवर आमदार निलेश लंके यांनी बुधवारी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांची भेट घेतली. त्यांनी स्थानिक शेतकऱ्यांची भूमिका मांडली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि राज्यातील आघाडी सरकार संबंधित शेतकऱ्यांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहतील अशी ग्वाही पवार यांनी दिली.त्याच बरोबर या प्रश्नाबाबत पुढील आठवड्यात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह त्यांची भेट घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी, नगर व पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संरक्षण खात्याने ताब्यात घेतलेल्या आहेत . यापुढील काळात सुमारे २५ हजार हेक्टर भूसंपादन करून विस्तारीकरणाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. या याला राहुरी तालुक्यातील १७, नगर तालुक्यातील ५ व पारनेर तालुक्यातील ५ गावांनी विरोध केला आहे. याविस्तारीकरणामुळे ही २७ गावे बाधित होणार असल्याने या अन्यायकारक भूसंपादनाला विरोध करण्यात आला आहे.१९४१ मध्ये लष्करी सरावासाठी म्हणून के. के. रेंज सुरू केले. त्यानंतर १९५६ मध्ये संरक्षण खात्याने सुमारे ४० हजार हेक्टर क्षेत्र कवडीमोल भावाने संपादित केले. आताही २५ हजार हेक्टर क्षेत्र नव्याने संपादित करण्यात येणार आहे. त्यामुळे पारनेर,नगर आणि राहुरीतील २७ गावे व त्यामध्ये राहणारे ग्रामस्थ विस्थापित होणार आहेत.नव्याने केल्या जाणाऱ्या या भूसंपादनाला तीव्र विरोध होत आहे. पारनेर अहमदनगरचे आमदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली हा लढा सुरू आहे.या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांना साकडे घालण्यात आलेले आहे. आ.लंके यांनी या विषयी पुन्हा मुंबई येथे पवार यांची भेट घेतली. के.के. रेंज विस्तारी करणासाठी विरोध असताना संरक्षण विभागा कडून सुरू असलेल्या हालचालीमुळे शेतकरी हवालदिल झाले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान शरद पवार यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन हा प्रश्न मार्गी लावू अशी ग्वाही यांनी आमदार निलेश लंके यांना दिली.


# सरकारचे धोरण आत्मघातकी, अर्थव्यवस्था आणखी रसातळाला जाईल

नवी दिल्ली,वृत्तसंस्था – भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी जीडीपीच्या आकडेवारीवर भाष्य केले आहे. या वर्षातील पहिल्या तिमाहीत विकास दर विक्रमी स्तराने घसरला आहे. यावर राजन यांनी लिंक्डइन पेजवर एक पोस्ट लिहिली आहे. जीडीपीमधील घसरण ही २३.९ टक्के इतकी असून भविष्यात ती आणखी खराब होऊ शकते. भारतीय अर्थव्यवस्थेला अमेरिका आणि इटलीपेक्षा अधिक नुकसान झाले आहे. हे दोन्ही देश कोरोनामुळे सर्वाधिक प्रभावित झालेले आहेत. अमेरिकाचा विकास दर १२.४ टक्के तर इटलीचा ९.५ टक्के घसरला आहे. जोपर्यंत करोनावर नियंत्रण मिळवले जात नाही तोपर्यंत भारतात खर्च करण्याची परिस्थीती कमकूवत असेल. आतापर्यंत सरकारने जितकी मदत केली



आहे, ती पुरेशी नाही. सरकार भविष्यात प्रोत्साहन पॅकेज देण्यासाठी आज साधन सामूग्री वाचवण्याची रणनीती राबवत आहे, जी आत्मघाती आहे. सरकारला वाटत आहे की, करोना व्हायरसवर नियंत्रण मिळवल्यानंतर पॅकेज जाहीर करू, पण परिस्थितीचा अंदाज घेण्यास ते चूकत आहेत. तोपर्यंत अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान होईल. अर्थ–व्यवस्थेकडे एका रुग्णाप्रमाणे पाहिले तर त्याला सातत्याने उपचारांची गरज लागते. आर्थिक मदतीशिवाय लोक अन्नधान्यावर खर्च कमी करतील, मुलांना शाळेला पाठवणार नाहीत, कर्ज घेतली, सोने गहाण ठेवतील असे अनेक प्रश्न निर्माण होतील, असे राजन म्हणाले. या आर्थिक अडचणीत अनेक छोट्या आणि मोठ्या कंपन्या कर्मचाऱ्यांना वेतन देणार नाहीत. त्यांच्यावरील कर्ज वाढेल आणि एक वेळ अशी येईल की वेतनच मिळणार नाही. जोपर्यंत करोनावर नियंत्रण मिळवले जाईल तो पर्यंत अर्थव्यवस्था रसातळाला पोहोचेल. रकारचे हे म्हणणे चुकीचे आहे की, रिलीफ आणि स्टिमुलसवर खर्च करू शकत नाही. साधन सामुग्रीची वाढ करण्यासाठी चतुराईने खर्च करावा लागेल.अन्यथा पुढील गंभीर परिस्थिती आणि अत्यंत हलाखीच्या अर्थव्यस्था घसरणीला सामोरे जावे लागेल आणि हे देशाला किंचीतही परवडणारे नसेल.

## आम्ही आपला जीव देऊ,पण आपले शब्द फिरवणार नाही



मुंबई, सोमवार – राज्यात सत्ताबदल होऊन नऊ महिने झाल्यानंतरही भाजपला आपण सत्तेत नसल्याची सत्य परिस्थिती पचवता आलेली नाही. तर दुसरीकडे,सत्ता सह–भागाच्या मतदानपूर्व आश्वासनाला भाजपने कसे सुरुंग लावले, याची शिवसेना जोरदार चर्चा करत आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या निधनाविषयी शोक संदेशपर केलेल्या भाषणात भाजपवर जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले, ''कृतज्ञता दर्शवणेदेखील एक दुर्मिळ गुण आहे, अन्यथा सत्तेची खुर्ची मिळाल्यानंतर सर्व काही विसरले जाते.'' दरम्यान, त्यांनी फडणवीस यांचे नाव न घेता मुख्यमंत्री–पदाचेही समान वाटप करायचे ठरले होते, याची भाजपला आठवण करून दिली.मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, एखाद्यावर विश्वास ठेवणे ही आपली दुर्बलता नसून आपला चांगुलपणा आहे. आपली संस्कृती अशी आहे की, आम्ही आपला जीव देऊ, पण आपले शब्द फिरवणार नाही. दरम्यान, २०१७ मध्ये मुंबई महा–पालिकेतील शिवसेनेच्या विजयाबद्दल प्रणव मुखर्जी यांनी माझे अभिनंदन केले होते, अशी आठवण मुख्यमंत्र्यांनी दिवगंत राष्ट्रपती भारतरत्न प्रणब मुखर्जींबद्दल सांगितली. तसेच, ते म्हणाले की, राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीच्या प्रचाराचा एक भाग म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासमवेत प्रणबदांनी मातोश्रीला त्यावेळेस भेट दिली असता त्यांनी मुखर्जी यांची प्रथम भेट घेतली होती, असेही मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यावेळी म्हणाले.

## निरव मोदीच्या भारतातील प्रत्यार्पणाची उलटी गिनती सुरु

### पंजाब नॅशनल बँक घोटाळा

लंडन (वृत्तसंस्था) – पंजाब नॅशनल बँक घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार नीरव मोदी याच्या भारतातील प्रत्यर्पणाची उलटी गिनती सुरु झाली आहे. सध्या तुरुंगात असलेल्या नीरव मोदी याच्या प्रत्यार्पणाच्या याचिकेवर आज सोमवारपासून वेस्टमिन्स्टर मॅजिस्ट्रेट कोर्टात सुनावणी सुरु झाली आहे. विशेष म्हणजे या सुनावणीसाठी भारतातून सक्तवसुली संचनालय (ईडी)ची टीम लंडनमध्ये दाखल झाली आहे.आज सुनावणीच्या पहिल्याच दिवशी नीरव मोदी याला कोर्टाने झटका दिला. नीरव मोदीच्या वकिल क्लेअर माँटगोमेरी यांनी माजी न्यायाधीश न्यायमूर्ती अभय ठिपसे यांचे माध्यमांमध्ये जाहीर झालेले मत वगळण्यात यावे अशी मागणी केली होती. मात्र कोर्टाने ती फेटाळली.न्यायमूर्ती अभय ठिपसे यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला असला तरी या हायप्रोफाईल प्रकरणी त्यांनी व्यक्त केलेलं मत महत्वाचा आहे.ते वगळता येणार नाही, असे न्यायाधीशांनी स्पष्ट केले.या सुनावणीला नीरव मोदी हा वँडर्सवर्थ तुरुंगातून व्हिडीओ कॉन्फरन्सने हजर झाला होता.१९ मार्च २०१९ रोजी त्याला स्कॉटलंड यार्ड पोलिसांनी अटक केली होती. तेव्हापासून तो तुरुंगात आहे. प्रथमदर्शनी पुराव्यानुसार केंद्र सरकारने नीरव मोदीच्या प्रत्यार्पणाची विनंती ब्रिटिश सरकारला केली होती.त्यावर नीरव मोदी याने आव्हान दिले होते.नुकताच इंटरपोलने नीरव मोदीची पत्नी ॲमी मोदी हिच्या विरोधात रेड कॉर्नर नोटीस बजावली होती.पंजाब नॅशनल बँकघोटाळ्यातील मुख्य सूत्रधार फरार हिरे व्यापारी नीरव मोदी याला सक्तवसुली संचनालयनाने (ईडी) दणका दिला आहे.नीरव मोदीची ३२९.६६ कोटींची संपत्ती ईडीने जप्त केली होती. त्यात मुंबई, दुबई आणि लंडनमधील फ्लॅटचा समावेश आहे.अलिबागमधील फार्मा हाऊसवरदेखील ईडीने टाच आणली आहे.वेस्टमिन्स्टर मॅजिस्ट्रेट कोर्टाने ७ ते ११ सप्टेंबर दरम्यान सुनावणीच्यातारखा निश्चित केल्या आहेत.

## कोरोनावर मात केलेल्यांनी अवश्य प्लाझ्मादान करावे



मुंबई । कोरोनामुक्त रुग्णांनी प्लाझ्मादान केल्यास कोरोनाबाधिताचा जीव वाचवणे शक्य होईल. त्यामुळे कोरोनावर मात केलेल्या रुग्णांनी प्लाझ्मादान करावे, असे आवाहन आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी कोरोनामुक्त रुग्णांना केले आहे. दरम्यान, महाराष्ट्रात कोरोनामुक्त पाच लाख लोक आहेत त्यातील प्लाझ्मादानासाठी बरेच जण पात्र असू शकतात. या सगळ्या योद्ध्यांनी जास्तीत जास्त पुढाकार घेऊन प्लाझ्मादानाच्या कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन टोपे यांनी केले आहे. कोरोनावर मात करण्यातसाठी राज्यात प्लाझ्माचा प्रयोग सुरू आहे आणि त्यामध्ये यशही मिळत आहे. साधारणपणे दहापैकी नऊ केसेसमध्ये प्लाझ्मा दिला गेला, ते रुग्ण बऱ्यापैकी लवकर बरे झाले असा त्यातला अनुभव आहे, असे टोपे यांनी म्हटले आहे.प्लाझ्मादानासाठी योग्यप्रकारे समुपदेशन करता आले पाहिजे. प्लाझ्मा देणे हे एक खूप श्रेष्ठदान आहे, हा विश्वास त्याला वाटणे हे महत्त्वाचे आहे. त्यासाठी त्याचे प्रबोधन करणे, प्रोत्साहित करणे, प्लाझ्मा दानासाठी प्रवृत्त करणे महत्त्वाचे आहे. काही स्वयंसेवी संस्थांनी त्यामध्ये सहभाग घेऊन या कार्यक्रमाला प्रतिसाद दिला तर नक्कीच प्लाझ्मादानाच्या कार्याला हातभार लागू शकतो. कोरोनाच्या विरुद्धलढण्याच्या दृष्टीकोनातून या कार्यामध्ये आपण हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.दरम्यान, एखाद्या समूहामध्ये किती संसर्ग झाला आहे याचे प्रमाण समजून येण्यासाठी केलेल्या अभ्यासानुसार धारावीमध्ये १०० पैकी ५६ लोकांमध्ये आयजीजी अँटीबॉडीज सापडल्या. याचा अर्थ प्रतिकारशक्ती निर्माण होण्याची सुरुवात झाली. सिरो सर्व्हेलन्स मुंबई, पुणे, मालेगाव आता औरंगाबादमध्ये काही प्रमाणात झाला आणखी काही हॉटस्पॉटमध्ये आपल्याला करता येऊ शकतो असेही त्यांनी सांगितले.




## पाच दिवसांत पाच मल्ल कोरोना पॉझिटिव्ह

नवी दिल्ली, (वृत्तसंस्था) – . गेल्या पाच दिवसांत भारताचे पाच मल्ल कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहे. यात जागितक स्पर्धेतील ब्राँझपदक विजेता राहुल आवारे याची भर पडली आहे. अलिकडेच त्याला अर्जुन क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. या सोहळ्यानंतर साईच्या सोनीपत येथील सराव केंद्रात दाखल झाल्यावर करण्यात आलेल्या चाचणीत आवारे पॉझीटिव्ह असल्याचे निष्पन्न झाले.कोरोनाबाधित झालेल्या भारतीय मल्लांत आवारे पाचवा मल्ल आहे.यापूर्वी खेलरत्न पुरस्काराने गौरविण्यात आलेली विनेश फोगट पॉझिटिव्ह आढळली होती. अर्थात,ती सर्वात आधी सापडली होती. त्यामुळे ती राष्टजऍीय पुरस्कार सोहळ्यासही उपस्थित राहिली नव्हती. त्यानंतर दीपक पूनिया.नविन आणि कृष्ण हे मल्ल पॉझिटिव्ह आढळले होते. सर्व मल्लांना सुरक्षेसाठी साईच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आवारे येथे आल्यापासून विलगीकरणात होता. तो येथे आल्यापासून कुठल्याही खेळाडू अथवा संघ सदस्याच्या संपर्कात आलेला नाही, असे साईने' स्पष्ट केले आहे.देशातील कोरोनाचा संसर्ग हटण्याचे कुठलेच चिन्ह दिसत नाही. लॉकडाऊनच्या काळात परिणाम झालेल्या क्रीडा क्षेत्राला टप्प्या टप्प्याने सुरवात होण्याचा दिलासा मिळत असतानाच भारतीय कुस्तीगीर मात्र कोरोनाच्या संसर्गात अडकत आहेत. कुस्तीच्या राष्ट्रीय सराव सत्रास सुरवात झाल्यापासून ही संख्या वाढू लागली आहे आणि यात आणखीही वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# मुस्लिम समाजाला शिक्षण, नोकरीमध्ये आरक्षण द्या



अहमदनगर । महाराष्ट्रात मुस्लीम समाजाची राजकीय सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक स्थिती अतिमागास झालेली आहे. त्यावर आधारित १० टक्के आरक्षण शिक्षण व नोकरी मध्ये मिळण्याच्या मागणीसाठी मुस्लिम आरक्षण निर्णय आंदोलन च्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवासी उपजिल्हाधिकारी संदीप निचित यांच्याशी चर्चा करून निवेदन देण्यात आले. यावेळी वहाब सय्यद, अफजल सय्यद,एमआयएमचे मुक्ती अल्ताफ,वसीम सय्यद, रफिक सय्यद, कादीर शेख आदी उपस्थित होते.महाराष्ट्रात मुस्लिम समाज सर्वस्तरावर अतिशय मागास झाला आहे. जसे की सच्चर समिती,मोहम्मदुरे रहमान समिती आणि रंगनाथ मिश्रा आयोग यांनी सखोल अभ्यास चौकशी करून आपापल्या अहवालात सादर केलेले आहे व १०टक्के आरक्षण मिळावे म्हणून स्पष्ट शिफारस केली आहे.मुस्लिम समाजाच्या आरक्षणाची कायदेशीर बाजू संविधानानुसार भक्कम आहे शासनाने कायदा करून आरक्षण देण्याची व भेदभाव न करता योग्य पाठपुरावा करण्याची राज्यघटनेतील कलम १५ आणि १६ यामध्ये अनुक्रमे शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याची तरतूद केलेली आहे. पण पूर्वीच्या सरकारने ज्या आधारावर मुस्लिम आरक्षण नाकारले होते.तो आधार पूर्णपणे चुकीचा आहे. संविधाना-नुसार आरक्षण धर्माच्या आधारावर देता येत नाही. मुस्लिम हा इस्लाम धर्माचा एक समूह आहे.धर्म नाही व त्यामुळे आमची मागणी मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक सामाजिक आर्थिक अति मागासलेपणावर आधारित आहे. शासनाने मुस्लिम आरक्षण चा कायदा करण्याची पुरावाच द्यायचा झाला तर उच्च न्यायालयाने मुस्लिम समाजाचे ५ टक्केशैक्षणिक आरक्षण मान्य केले होते. त्यावरून हे स्पष्ट झाले आहे. की मुस्लिम आरक्षणात धर्माचा अडसर नाही.आगामी पावसाळी अधिवेशनात मुस्लिम आरक्षणा संदर्भात कायदेशीर व घटनात्मक रित्या द्यावे यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात व तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयात मुस्लिम आरक्षण निर्णय आंदोलनाच्या माध्यमातून सर्व महाराष्ट्र मुस्लिम समाजाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

# ५८ कोटींच्या अपहाराची चौकशी करा

अहमदनगर । सावंत ट्रान्सपोर्ट लिमिटेडला दिलेल्या कर्जाच्या रकमेत आणि विमा पॉलिसीच्या रकमेत एकूण ५८.२० कोटींच्या अपहाराची सखोल चौकशी करावी, अशी मागणी ईडी आणि सीबीआयकडे सावंत ट्रान्सपोर्टचे संचालक सुजित सावंत यांनी केली आहे. दरम्यान, याच प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने सुजित सावंत यांचा जबाब नोंदविला आहे. दोषींवर कडक कारवाई करून गुन्हा दाखल करण्याची सावंत यांनी केली आहे.सावंत ट्रान्सपोर्टचे संचालक अभिजित सावंत यांनी ६ सप्टेंबर २०१८ रोजी आत्महत्या केली होती. सुसाईड नोटमध्ये अभिजित यांनी सर्व माहिती लिहिली होती. अभिजित माझा मोठा भाऊ असून कंपनीला दिलेल्या कर्जाच्या रकमेत आणि विमा पॉलिसीच्या रकमेत एकूण ५८.२०कोटींचा अपहार झाला आहे. आम्ही दोघा भावांनी आयुष्यात पैशापेक्षा कामाला महत्त्व दिले. परंतु आर्थिक व्यवहारांच्या तपशीलाकडे केलेले दुर्लक्ष आमच्या मुळावर आले. आमचे पैसे घेऊन काही लोक आमच्याच जिवावर उठले असून,या रॅकेटने माझ्या भावाला मानसिकदृष्ट्या हताश केले. त्यामुळे अंत्यतिक निराश झालेल्या माझ्या भावाला आत्महत्येला प्रवृत्त करण्यास काही लोक जबाबदार आहेत.तेच लोक हाच प्रकार माझ्या बाबतीत अवलंबवत आहेत. या रॅकेटमुळे माझ्या जीवाला धोका आहे. मला संपविण्यासाठी हे लोक त्याच्या विमा पॉलिसीच्या पैशांचा दुरुपयोग करत आहेत. अभिजितने त्याच्या इन्श्युरन्सच्या पैशांपैकी काही पैसे माझ्या नावे ठेवत असल्याचे आपल्या सुसाईड नोटमध्ये नमूद केले आहे. हे पैसे त्यांनी मला दिले नाहीत.उलट त्याऐवजी माझ्याजवळच्या लोकांना त्यांनी थोडेफार पैसे देऊन माझ्या विरोधात उभे केले आहे. या मंडळींची मदत घेऊन हे लोक माझ्याच विरोधात कट-कारस्थान रचत आहेत. माझ्याच विरुद्ध मलाच संपविण्यासाठी दुरुपयोग केला जात आहे.सध्या गाजत असलेल्या दिवंगत अभिनेता सुशांतसिंग राजपूत प्रकरणाप्रमाणे ईडी व सीबीआयने सखोल चौकशी करून मला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी सुजित सावंत यांनी निवेदनात केली आहे. दरम्यान, या प्रकरणाबाबत सुजित सावंत यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयातील आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार दाखल केली होती.

# राज्याप्रमाणे केंद्रानेही ग्रामसेवकांना ५० लाखांचे विमा कवच द्यावे : ढाकणे

ग्रामीण भागात करोनाचा प्रसार रोखतानाच व्यापक जनजागृती करण्यासाठी ग्रामसेवक अविरत काम करीत आहेत. याकालावधीत अनेकांना करोनाची लागण झाली आहे तर ७ ग्रामसेवक करोनामुळे मयत झाले आहेत. मार्चपासून अक्षरश: चोवीस तास कर्तव्य बजावणारे ग्रामसेवक आता थकले असून त्यांना किमान १५ दिवसांची सुटी देण्यात यावी तसेच ग्रामसेवकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने ओशासने न देता ठोस पावले उचलण्याची गरज आहे. यासाठी पुढील काळात व्यापक आंदोलन उभारुन संघर्ष करण्याचा एकमुखी निर्धार महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियनने केला आहे. ग्रामसेवकांना राज्य सरकारने ५० लाखांचे विमा कवच दिले आहे. यात केंद्र सरकारनेही आपली जबाबदारी उचलून केंद्राकडूनही ५० लाखांचे विमा कवच उभारावे असा ठराव युनियनच्या त्रैमासिक सभेत करण्यात आल्याची माहिती, युनियनचे राज्य अध्यक्ष एकनाथ ढाकणे यांनी दिली. महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियनची त्रैमासिक सभा झूम ऍपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली. या मिटिंगमध्ये राज्याध्यक्ष एकनाथ ढाकणे नगरमधून सहभागी झाले होते. यावेळी त्यांच्यासमवेत युनियनचे राज्य सरचिटणीस प्रशांत जामोदे, कोषाध्यक्ष संजीव निकम, सोलापूरचे जिल्हाध्यक्ष शरद भुजबळ, बुलढाणा येथील चव्हाण, जालना येथील समाधान वाघ, शेळके, अशोक काळे, राजेंद्र पावसे, अशोक नरसाळे, सुनील नागरे, मंगेश पुंड, बाळासाहेब आमरे आदी उपस्थित होते.राज्यभरातील पदाधिकारी, जिल्हा युनियनचे जिल्हाध्यक्ष, सचिव यांनी या ऑनलाईन मिटिंगमध्ये सहभाग नोंदवला.

# विधानपरिषदेच्या उपसभापतीपदी नीलम गोऱ्हे यांची बिनविरोध निवड



मुंबई । वृत्तसंस्था - पीडित महिलांसाठी आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्या नीलम गोऱ्हे यांची बिनविरोध उपसभापती-पदी आज निवड करण्यात आली. महाविकास आघाडीकडून उपसभापतीपदासाठी नीलम गोऱ्हे यांच्या नावाची निवड करण्यात आली होती. तर भाजपकडून भाई गिरकर यांनी अर्ज भरला होता. परिवहनमंत्री अनिल परब यांनी याबाबतचा प्रस्ताव मांडला. त्यानंतर गिरकर यांनी अर्ज मागे घेतला. नीलम गोऱ्हे यांची उपसभापतीपदी बिनविरोध निवड करण्यात आली. दरम्यान, उपसभापती निवडणुकीच्या वेळी भाजपने सभात्याग केला. निवडणुकीपूर्वी भाजपने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. याबाबतचा निकाल गुरूवारी न्यायालय देणार असल्याची माहिती प्रवीण दरेकर यांनी दिली. तसेच या ठिकाणी न्यायालयाचा निकाल येईपर्यंत निवडणूक घेऊ नये, अशी विनंतीही त्यांनी केली. यावर सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांनी आपण आपल्या निर्णयावर ठाम असल्याचे सांगत आवाजी मतदान घेण्यात आले आणि नीलम गोऱ्हे यांची उपसभापतीपदी नियुक्ती करण्यात आली. न्यायालयाने आपल्याला बोलावले नाही. न्यायालयान ेनिकालाबद्दल सांगितले नाही,म्हणून हे मान्य करता येणार नाही. निवडणुकीचा प्रश्न नाही. मी माझ्या निर्णयावर ठाम आहे. उच्च न्यायालयाने समन्स दिले तर त्यावर आपण उत्तर देऊ,असे सभापती रामराजे नाईक निंबाळकर यावेळी म्हणाले. नियुक्तीनंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गोऱ्हे यांचे अभिनंदन केले. गोऱ्हे यांची उपसभापतीपदी दुसऱ्यांदा निवड झाली असून त्यांच्या यशाची कमान अशीच उंचावत जावो, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे त्यांना शुभेच्छा देताना म्हणाले. सध्या कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर दोनदिवसीय अधिवेशन बोलावण्यात आले आहे. परंतु या अधिवेशनादरम्यान अनेक सदस्य अनुपस्थित आहेत.

# ७0:३0 प्रादेशिक कोटा कार्यपध्दती रद्द वन महाराष्ट्र,वन मेरिट नुसार वैद्यकीय प्रवेश



मुंबई (जिमाका) : राज्यातील आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशामध्ये ७० टक्के प्रादेशिक कोटा आणि ३० टक्के राज्यस्तर कोटा या धर्तीवर यापूर्वी प्रवेश करण्यात येत होते. मात्र आता ७०:३० प्रादेशिक कोटा कार्यपद्धत रद्द करण्यात आली असल्याने वन महाराष्ट्र, वन मेरिट अशी वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया असेल असे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी विधानसभेत घोषणा केली. यापूर्वी उर्वरित महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ असे तीन प्रादेशिक विभाग करण्यात आलेले होते, ज्या प्रादेशिक विभागातून उमेदवार १२ वी उत्तीर्ण झालेला असेल त्या उमेदवारांसाठी त्यांच्या संबंधित प्रादेशिक विभागातील महाविद्यालयामध्ये ७० टक्के जागा राखीव असत. तसेच ३० टक्के जागा ह्या संपूर्ण राज्यातील उमेदवाराकरिता उपलब्ध असत. तीनही प्रादेशिक विभागामध्ये महाविद्यालयांची संख्या आणि पर्यायाने प्रवेशसाठी उपलब्ध जागांची संख्या भिन्न होत्या. त्यामुळे मराठवाड्यासारख्या प्रादेशिक विभागामध्ये जेथे महाविद्यालयांची संख्या कमी आहे, तेथील विद्यार्थ्यांना ७० टक्के प्रादेशिक जागामध्ये कमी जागा उपलब्ध होत होत्या. त्यामुळे उच्च गुणवत्ता असूनही तेथील उमेदवारांना त्यांच्या पसंतीच्या महाविद्यालयात प्रवेश मिळत नव्हता. तर काही विद्यार्थ्यांना प्रवेशास मुकावे लागत होते. त्यामुळे ७०:३० कोटा पध्दत ही गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांवर अन्यायकारक असल्याने मराठवाड्यातील पालकांकडून व विद्यार्थ्यांकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून सदर कार्यपध्दती रद्द करण्याची वारंवार मागणी होत होती.

# एल्गार परिषद प्रकरणात एनआयएने आणखी दोन जणांना अटक

पुणे । एल्गार परिषद प्रकरणात एनआयएने आणखी दोन जणांना अटक केली आहे.अटक करण्यात आलेले दोन्ही आरोपीस पुण्यातील कबीर कला मंचचे कलाकार असून त्यांचे माओवादी संघटनेशी संबध असल्याचा आरोप आहे.ते एल्गार परिषद आयोजित करण्यात आलेल्या समितीचे सक्रिय सदस्य आहेत. सागर गोरखे आणि रमेश गायचोर अशी या दोघांची नावे आहेत. पुण्यात २०१७ मध्ये शनिवार वाड्यावर एल्गार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर कोरेगाव भीमा येथे हिंसाचाराची घटना घडली. या प्रकरणाचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) करत आहेत.सध्या प्रकरणात त्यावेळी काही कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर आज एनआयएने आणखी दोघांना पुण्यात अटक केली आहे.ज्या समितीने एल्गार परिषद आयोजित केली होती, त्या भीमा कोरेगाव शौर्य दिन प्रेरणा अभियान समितीचे हे दोघे त्यावेळी सक्रिय सदस्य होते.आणखी दोन दोघांना अटक केल्यामुळे या प्रकरणात अटक करण्यात आलेल्यांची संख्या १४ झाली आहे. यात अटक झालेले अनेकजण मानवी हक्क कार्यकर्ते, प्राध्यापक आणि वकील आहेत.जुलैमध्ये एनआयएने दिल्ली विद्यापीठातील प्रा. हनी बाबू एम. टी यांना अटक केली होती. त्यानंतर एनआयएने गोरखे आणि गायचोर यांच्यासह अनेकांना चौकशीसाठी समन्स पाठवले होते.मागील काही दिवसांपासून गोरखे आणि गायचोर यांना एनआय एकडून मुंबईला चौकशीसाठी बोलवले जात होते. त्यानंतर सोमवारी त्यांना अटक करण्यात आली,' अशी माहिती आरोपींचे वकील मिहीर देसाई यांनी सांगितले. पुण्यात ३१ डिसेंबर, २०१७ रोजी शनिवार वाड्यावर 'एल्गार परिषद' झाली. दुसऱ्याच दिवशी १ जानेवारी २०१८ रोजी कोरेगाव भीमा परिसरात हिंसाचार झाला. पुढे 'एल्गार परिषद' संबंधित दाखल गुन्ह्यात पुणे शहर पोलिसांनी देशभरातून ९ लोकांना अटक केली व एकूण २३ जणांना आरोपी केले होते. यात गोरखे आणि गायचोर यांचीही नावे होती. हे सर्व आरोपी प्रतिबंधित माओवादी संघटनेचे सक्रिय सदस्य असल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला.तसेच प्रतिबंधित माओवादी संघटनेच्या ध्येय धोरणानुसार माओवाद्यांचे पैसे वापरून एल्गार परिषद आयोजित केल्याचाही आरोपही पोलिसांनी केला होता.

साप्ताहिक दर्शक
हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशन,संस्थापक संपादक शेख रियाजोद्दीन फजलोद्दीन यांनी दर्शकभवन,७२६,सरोष प्रिंटर्स,दिपाली थिएटर समोर,झेंडीगेट रोड,अहमदनगर ४१४००१
महाराष्ट्र येथे मुद्रीत करून येथेच प्रकाशित केले.बातम्यांची जबाबदारी कार्य.संपादक शेख आदिल रियाजोद्दीन यांच्यावर राहील मो.९७६३०३०३८६, ७६६६६०२६६० (अहमदनगर न्यायकक्षेत)

## इंडियन असोसिएशन ऑफ लॉयर्सच्या वतीने प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीशांना निवेदन

# नियमांचे पालन करुन न्यायदान प्रक्रिया पार पाडली जाऊ शकते

अहमदनगर - करोना महामारीच्या टाळेबंदीपासून तातडीचे प्रकरण वगळता इतर प्रकरणांचे कामकाज बंद असून, अटीशर्तीसह न्यायालयीन कामकाज पूर्ववत सुरु होण्याच्या मागणीसाठी इंडियन असोसिएशन ऑफ लॉयर्सच्या शिष्टमंडळाने प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश श्रीकांत आणेकर यांची भेट घेऊन निवेदन दिले. मागणीचे निवेदन मुख्य न्यायमूर्तींना पाठवून प्रश्न मार्गी लावण्याची विनंती करण्यात आली.यावेळी ॲड. सुभाष लांडे, ॲड. सुधीर टोकेकर, ॲड. संदीप म्हस्के, ॲड. सुधीर बाफना, ॲड.प्रकाश हिवाळे, ॲड. अतिश लांडे उपस्थित होते.निवेदनात म्हटले आहे की, गेल्या पाच महिन्यांपासून न्यायालय फक्त तातडीच्याकामकाजासाठी सुरू आहे.टाळेबंदी सुरु होण्यापूर्वी दाखल केलेली अनेक प्रकरणे पूर्णपणे थांबली आहेत. लॉकडाऊनमुळे बहुसंख्य वकिलांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. सर्व जीवनमान सुरळीत होत असताना न्यायालयाचे कामकाज मात्र पूर्वपदावर येताना दिसत नाही.अनेक व्यवसाय, उद्योगधंदे व वाहतूक व्यवस्था करोनाच्या संकटात नियमांचे पालन करुन काळजी घेऊन सुरु झाल्या आहेत. अनेक ठिकाणी न्यायालयाच्या इमारती अद्यावत व प्रशस्त झाल्या आहेत. न्यायदान कक्षात न्यायाधीश, वकील, लिपिक व साक्षीदाराची जागा यामध्ये तीन फुटांपेक्षा जास्त अंतर ठेवणे सहज शक्य आहे. कागदपत्र हाताळताना हातमोजे घालणे, शारीरिक अंतर पाळणे, मास्कचा वापर, ५ पेक्षा जास्त व्यक्तींना परवानगी न देणे व इतर नियमांचे पालन करुन न्यायदान प्रक्रिया पार पाडली जाऊ शकते. सामान्य नागरिक न्यायासाठी वाट पाहत आहे.पाच ते सहा महिने न्यायालय बंद असणे हे देशाला परवडणारे नाही. प्रलंबित प्रकरणांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सामाजिक स्वास्थ्यासाठी हॉस्पिटलप्रमाणे न्यायालयाची समाजाला गरज आहे. मागील पाच ते सहा महिन्यांपासून न्यायालयाचे कामकाज बंद असल्याने त्याचा परिणाम वकिलांच्या व्यवसायावर झाला आहे. अनेकांनी विविध कारणासाठी कर्ज घेतले आहे.मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा उदरनिर्वाह, तर कोणी भाडे तत्वावर राहत आहे. तातडीच्या प्रकरण वगळता सर्व प्रकरणाचे कामकाज बंद असल्याने वकिलांपुढे मोठा आर्थिक प्रश्न उभा राहिला आहे.दोन सत्रांतील कामकाज बंद करून सर्व न्यायालयांचे नियमितपूर्णवेळ कामकाज पूर्ववत सुरू करावे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

### संकट काळाचा गैरफायदा घेत केंद्र सरकारने राबविलेल्या शेतकरीविरोधी धोरणाच्या निषेधार्थ

# किसान सभा व लालबावटा शेतमजूर युनियनवतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने




अहमदनगर । कोरोनाच्या संकटकाळात शेतकरी व शेतमजुरांच्या ज्वलंत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून या संकट काळाचा गैरफायदा घेत केंद्र सरकारने राबविलेल्या शेतकरीविरोधी धोरणाच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य किसान सभा व लालबावटा शेतमजूर युनियनच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात ॲड.कॉ.सुभाष लांडे, ॲड.कॉ. बन्सी सातपुते, ॲड.कॉ.सुधीर टोकेकर, अंबादास दौंड, सतीश पवार,सुभाष शिंदे, दिपक शिरसाठ, तुषार सोनवणे,चंद्रकांत माळी, कॉ.दत्ता वडवणीकर, संतोष गायकवाड, भैरवनाथ वाकळे, रामदास वागस्कर, विकास गेरंगे, अमोल पळसकर, सतीश निमसे, दत्ता जाधव, आकाश साठे आदि सहभागी झाले होते.कोरोना महामारीचा काळ हा शेतकरी शेतमजुरांसाठी अत्यंत संकटाचा ठरलेला आहे. या काळाचा गैरफायदा घेत केंद्र सरकारने शेतकरी विरोधी व शेतकऱ्यास गुलाम करणारी तसेच व्यापाऱ्यांसाठी लुटीच्या संधी उपलब्ध करून देणारे विविध अध्यादेश पारित केले असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या शेतकरी विरोधी निर्णयामुळे शेतकरी, शेतमजूर देशोधडीला लागणार आहे.शेतकऱ्यांच्या जगण्या मरण्याचा प्रश्न आणखी गंभीर होणार आहे. सरकार हे रोज होणाऱ्या शेतकरी आत्महत्या रोखू शकलेले नाही.त्यात हे नवे संकट सरकार उभे करीत आहे.स्वामीनाथन आयोग लागू करणे ही प्राधान्याने गरज असताना सरकार या विषयाकडे प्रचंड दुर्लक्ष करत असून, यामधून सरकारची शेतकऱ्यांनाप्रति असलेली अनास्था दिसून येत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. अहमदनगर जिल्ह्यातील लष्कराच्या के.के. रेंज मध्ये नव्याने जात असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतजमीन वाचवाव्या, दुधाला ३५ रुपये प्रति लिटर दर देऊन १० रुपये लिटरचे रोख अनुदान द्यावे, शेतमालाला देत असलेल्या हमीभावात वाढ करावी, शेतकऱ्यांना बँका कर्ज देत नसल्याने त्यांना पतसंस्थेचे उंबरठे झिजवावे लागत असून, शेतकरी, शेतमजुरांचे सर्व पतसंस्थेतील कर्ज माफ करावे, शेतकरी शेतमजूर व ग्रामीण कारागिरांना दरमहा ५ हजार रुपये पेन्शन द्यावी, अन्नसुरक्षा कायद्याची सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत हमी निर्माण करावी, पेट्रोल-डिझेलची भरमसाठ झालेली दरवाढ कमी करावी, मनरेगाचे काम वर्षातून २०० दिवस आणि प्रतिदिन ६०० रुपये मजुरी देण्यात यावी, आयकर न भरणाऱ्या सर्व कुटुंबांना कोरोना काळाचा उदरनिर्वाह भत्ता म्हणून दरमहा ७ हजार ५०० रुपये देण्यात यावा, कोरोना काळाचा गैरफायदा घेत शेतकरीविरोधी काढलेले सर्व अध्यादेश रद्द करावे, शेतकरी शेतमजुरांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, बोगस बियाणे कंपन्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, बोल्हेगाव येथील शेतकऱ्यांचा गावगुंडाने बंद पाडलेला शेत रस्ता त्वरित सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# बाधितांची संख्या २७ हजारांवर

अहमदनगर : जिल्ह्यातील कोरोनाबाधितांची संख्या २७ हजारांहून अधिक झाली असून रुग्णसंख्या याच गतीने वाढत राहिली, तर पुढच्या पाच दिवसांत तीस हजारांचा टप्पा ओलांडला जाईल. कोरोनामुळे एकाच दिवसांत ११ जणांचा मृत्यू झाला.नव्याने ६२५ जणांना बाधा झाली.जिल्ह्यात आज ५२४ जणांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आता बरे झालेल्या रुग्णांची एकूण संख्या २२ हजार ६७४ झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण ८३.६४ टक्के झाले. दरम्यान, गेल्या २४ तासांत रूग्णसंख्येत ६२५ ने वाढ झाली.त्यामुळे उपचार सुरू असणाऱ्या रुग्णांची संख्या आता चार हजार ४६ झाली आहे. जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना चाचणी प्रयोगशाळेत २२८, खासगी प्रयोगशाळेत २२२ आणि अँटीजेन चाचणीत १७५ रुग्ण बाधीत आढळले. जिल्हा रुग्णालयाच्या चाचणी प्रयोगशाळेत होकारात्मक अहवाल आलेल्या रुग्णामध्ये अहमदनगर शहर १२०, पाथर्डी ११, नगर ग्रामीण ११, श्रीरामपूर २, भिंगार १, नेवासे ४, श्रीगोंदे २, पारनेर १, राहुरी २, शेवगाव ४८, कोपरगाव १,जामखेड ५, मिलिटरी हॉस्पिटल १४ आणि इतर जिल्हा सहा अशा रुग्णांचा समावेश आहे. खासगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत बाधित आढळून आलेल्या २२२ रुग्णांची नोंद एकूण रुग्णसंख्येत घेण्यात आली. त्यात अहमदनगर शहर १३३, संगमनेर १, राहाता १२,पाथर्डी ३, नगर ग्रामीण २३,श्रीरामपूर ७, भिंगार २, नेवासे १,श्रीगोंदे ५, पारनेर ६, राहुरी १३,शेवगाव २, कोपरगांव ६ जामखेड ५ आणि कर्जत तीन अशा रुग्णांचा समावेश आहे.अँटीजेन चाचणीत आज १७५ जण बाधित आढळले. त्यात यासंगमनेर १९, राहाता १४, नगर ग्रामीण दोन, श्रीरामपूर १५, नेवासे ३१, श्रीगोंदे १५, अकोले ४, राहुरी २, शेवगाव २०, जामखेड २८ आणि कर्जत २५ अशा रुग्णांचा समावेश आहे.दरम्यान, आज ५२४ जण बरे झाल्यामुळे त्यांना डिस्चार्ज मिळाला.त्यात अहमदनगर शहर २०१, संगमनेर २२, राहाता ४०, पाथर्डी २१, नगर ग्रामीण ३८, श्रीरामपूर ३६, भिंगार १७, नेवासे ६, श्रीगोंदे ५, पारनेर १५, अकोले १५, राहुरी २६, शेवगाव १७, कोपरगाव २४, जामखेड १४, कर्जत २०, मिलिटरी हॉस्पिटल ६ आणि इतर जिल्हा एक अशा रुग्णांचा समावेश आहे.

अन्याय,अत्याचार आणि भ्रष्टाचाराला वाचा फोडणारे एकमेव निर्भिड वृत्तपत्र

दर्शक

फेसबुक,ट्वीटर वर लाईक करा
फॉलो करा
दर्शक न्युज वेब पोर्टल
लाईक करा फॉलो करा

दर्शकचे वार्षिक सभासद व्हा
जाहिरातींसाठी संपर्क करा

संपर्क
दर्शकभवन,झेंडीगेट
अहमदनगर-४१४००१
मो. ९७ ६३ ०३ ०३ ८६
७६ ६६ ६० २६ ६०

आपली बातमी खालील ई-मेल वर पाठवा
e-mail - weeklydarshak@gmail.com

# 'हमेशा तुमको चहा' चहा.. चहा...

रविवार दुपार. जेवण करून वामकुक्षी साठी आदर्श वेळ. अचानक आपल्या पत्रिकेतील ग्रह फिरतात आणि ओळखीच्या कोणाचं तरी पुढच्या आठवड्यात 'कार्य निघतं'. 'आहेर म्हणून आपण पाकिटात पैसे घालून देऊ' असं ओठांवर आलेलं वाक्य पूर्वानुभवामुळे गिळावं लागतं. फक्त मित्रांबरोबर बाहेर हिंडायला आवडतं, देण्याघेण्याचे व्यवहार अजिबात कळत नाहीत वगैरे वाक्यं आपलीच वाट बघत असतात. लक्ष्मी रोड वर दुपारी (त्यातल्या त्यात) गर्दी कमी म्हणून दुपारी २ ला आपण अर्धांगिनी बरोबर 'आहेर म्हणून बाहेर' पडतो.पहिल्या २-३ दुकानात काहीच पसंत पडत नाही. मग 'हस्तकला' मध्ये पंजाबी ड्रेस मटेरियल चा नवीन स्टॉक आलाय तर तिकडे जाऊ, असं ठरतं. दुपारी ३:३० ची वेळ. डोळ्यावर झोप आणि 'ह्यामध्ये अजून कुठले कलर आहेत?' हे ऐकून विटलेले कान. अश्या वेळी तळमजल्यावरील अमृततुल्य च्या दिशेने 'चहाचा वास' येतो. 'तू बघ तोपर्यंत मी जरा चहा (आणि माझी अनावर झोप!) मारून येतो असं म्हणून आपण खाली सटकतो. पांढऱ्या जाड कपात तो (देवदूत) चहा ओततो. पहिल्या घोटातच सगळा शीण नाहीसा होऊन तरतरी येते. ह्या चहाच्या दुकानांना 'अमृततुल्य' इतकं समर्पक नाव दुसरं नाही! देव-दानवांना बायकोबरोबर दुपारी खरेदीला बाहेर पडायची वेळ आली नसावी. नाहीतर चहा सारखं पेय असताना अमृतमंथनाच्या भानगडीत ते कधीच पडले नसते. पुण्याच्या मध्यवस्तीतील ही अमृततुल्ये केवळ चहाची दुकाने नाहीत. तिथला धगधगता स्टोव्ह चहा रुपी देवाची साधना करण्यासाठी मांडलेला यज्ञ आहे. मोठ्या पातेल्यात चहा पावडर, साखर ह्याची आहुती टाकली जाते. पितळेच्या खलबत्त्यात आलं-वेलदोडे कुटून घंटानाद होतो. सराईत पुजाऱ्याप्रमाणे सगळ्या कृती सुरु असतात. कापडातून चहा गाळून भक्तांना "Tea-W©" वाटप करण्यात येते.दिवसाच्या कुठल्याही वेळेला 'चहा घेणार का?' ह्या प्रश्नाला जर घोटभर चालेल अशी तुमची प्रतिक्रिया असेल तर समजा की तुम्ही (माझ्यासारखेच) चहाबाज आहात. पुण्यातच ऐकलेलं वाक्य नेहमी आठवतं- 'बायकांनी कुंकवाच्या बोटाला आणि पुरुषांनी चहाच्या घोटाला कधी नाही म्हणू नये'. दारू न पिणाऱ्यास teetotaler म्हणतात. तर मग चहा न पिणाऱ्या लोकांना tea-totaler म्हणायला काय हरकत आहे? डिक्शनरी बनवणाऱ्या ऑक्सफर्ड, केम्ब्रिज वगैरे मंडळींनी ह्याची कृपया दखल घ्यावी. गोर-गरिबांपासून अतिश्रीमंतापर्यंत सर्वत्र संचार करणारं हे एक महान द्रव्य आहे. हातावर पोट असणाऱ्या मजुरांच्या 'चहा-पोळी' नाश्त्यापासून ते अगदी श्रीमंतांच्या 'High Tea' पर्यंत ह्याचा वावर असतो.एकाच माणसाच्या व्यक्तिमत्वाचे विविध प्रसंगात अनेक पैलू समजतात तसंच चहाचं देखील आहे. सुट्टीच्या दिवशी सकाळी पेपर वाचत चहा एखाद्या निवांत माणसासारखा वाटतो. तर तोच चहा ऑफिस ला जाण्याच्या घाईगडबडीत 'लवकर मला पिऊन टाका' असा म्हणत असतो. ऑफिस मधला मशीन चा चहा रोजच्या रुटीन सारखा बेचव लागतो. तोच ऑफिसच्या रटाळ मीटिंग मध्ये 'करमणुकीचा आधार' वाटतो हॉस्पिटल मध्ये रात्रभर जागरण झाल्यावर सकाळी येणारा चहा हवाहवासा वाटतो. त्याचप्रमाणे रेल्वेप्रवासात येणारा 'चाय गरम'. टपरीवरचा 'कटिंग' चहा, सर्दी-खोकला झाल्यावर 'गवती चहा', कॉलेज कँटीनला मित्रांबरोबर 'चाय पे चर्चा', पाऊस न्याहाळत खिडकीतला चहा, ट्रेकिंग ला चूल मांडून केलेला चहा. मस्का-पाव बरोबरचा इराणी चहा, स्पेशल 'मलई मारके' चहा, उन्हाळ्यातला 'Ice Tea' अशी अनेक रूपे. सगळीच त्या-त्या वेळी हवी-हवीशी वाटणारी. 'फुकट ते पौष्टिक' हे बऱ्याच वेळा खरं असलं तरी दर वेळी फुकटात मिळणारा चहा चांगला असेलंच असं नाही. लांबच्या विमानप्रवासात रात्रीच्या जेवणानंतर मिळणारा चहा ह्याचं उत्तम उदाहरण आहे. रात्री १:३० ची फ्लाईट. विमानातील जेवण होईपर्यंत ३ वाजतात. आता ही वेळ काही चहाची आहे का हो? अश्या (अ)वेळी 'कोरा चहा' घेऊन तितक्याच कोऱ्या चेहेऱ्याची हवाई सुंदरी येते. कोरा चहा कपात ओतून कृत्रिम हसून निघून जाते. मग आपणच त्यात साखर आणि दुधाची पावडर घालून 'चहा(सदृश पदार्थ) बनवायचा. चहा ह्या पेयाचा इतका अपमान दुसऱ्या कोणीच केला नसेल!चहाचा अजून एक अपमान म्हणजे authentic चायनीज रेस्टारंटसमध्ये जेवणानंतर मिळणारा 'जस्मिन टी'. चिनी लोकांनी एकही प्राणी आणि भाजीपाला सोडला नाही खायचा. सगळे प्राणी आणि भाज्या संपल्यावर फुलांकडे त्यांची (मिचमिची) दृष्टी पडली असावी. मोगरा, शेवंतीचा वास चांगला म्हणून त्याचा चहा? 'च्या'यला! ज्या देशात चहाचा शोध लागला त्याच लोकांनी असं करावं ह्यापेक्षा दुर्दैव कुठलं? कटिंग चहा आणि फूल चहा माहिती होतं. पण फुलं घातलेला चहा 'Is not my Cup of Tea'! चहा कसा करायचा हे समजत नसल्याने देशाचं नाव 'चाय'ना पडलं असावं.चहाची कधी तलफ येते, कधी सवय होते, कधी शिष्टाचार म्हणून, तर कधी कंटाळा आला म्हणूनही चहा घेतला जातो. पूर्वी स्मार्ट-फोन्स नव्हते तेव्हा चहा हे उत्तम वेळ घालवण्याचं साधन होतं. जीवन सुरक्षेसाठी LIC ला आणि एखाद्या ठिकाणी अर्धा-पाऊण तास काढायचा असेल तर चहाला पर्याय नाही. प्रवासात पाय मोकळे करायला उतरतो तेव्हा भूक नसेल तर टाइम पास म्हणून चहा. भूक लागली असेल पण खायला नसेल तरी चहा. आयत्या वेळी येणाऱ्या पाहुण्यांसाठी चहा. लग्नाची बोलणी करायला देखील 'इसीलिये मम्मी ने मेरे तुझे चाय पे बुलाया हैं'. सहज घरी भेटायला या सांगायचं असेल तर 'चहाला या ना' असंच म्हणतो. 'चहाला आलंच पाहिजे' असं आग्रहाचं निमंत्रण मोडवत नाही म्हणून आपण जातो. मात्र चहात 'आलंच' नसेल तर हिरमोड होतो. सरकारी ऑफिसातली आपली कामे करून घेण्यासाठी जी चिरीमिरी द्यावी लागते त्यालाही 'चायपानी'चे आवरण मिळते. शुल्लक भांडणांना 'चहाच्या पेल्यातील वादळ' म्हणतात. जेम्स वॅट ला चहाची आवड नसती तर वाफेवर चालणाऱ्या इंजिनाचा शोध लागायला अजून 'वॅट' पहावी लागली असती. चहा उत्तम साथीदार आहे कंटाळवाण्या प्रवासात जसा साथ देतो तसा बिस्किटापासून वडापाव पर्यंत सगळ्या पदार्थांना देखील उत्कृष्ट साथ देतो. मूळ पदार्थाच्या चवीवर कुरघोडी न करता. असा बहुगुणी आहे (च)हा.केरळ, तामिळनाडू भागांत एका कपातून उंचावरून दुसऱ्या कपात ओतून 'फेसाळता' चहा देतात. कापडाच्या दुकानात गजाने कापड मोजताना जेवढा लांब हात नेतात तितक्या उंचीवरून चहा ओततात. बहुधा 'मिलीलीटर' ऐवजी 'मीटर' वर चहा विकत असावेत.कालानुरूप चहा बनवायची पद्धत बदलली तशी चहा द्यायची देखील. अमृततुल्य मध्ये पांढऱ्या जाड कपात चहा. टपरीवर काचेच्या छोट्या ग्लास मध्ये 'कटिंग' चहा. दाक्षिणात्य हॉटेलात स्टीलचा ग्लास आणि वाटी. लग्नकार्यात आणि ऑफिसात चॉकलेटी रंगाच्या कपात चहा. असा सुटसुटीत प्रकार असायचा. आधुनिकतेच्या जमान्यात चहाचा कान उपटला गेला आणि प्लास्टिकच्या छोट्या ग्लासात चहा देऊ लागले. हायवे वरील फूड मॉल्स वर तर इतक्या लहान कपात चहा देतात कि 'चहा कपात' चा चुकीचा अर्थ त्यांनी लावला असावा बहुधा.Middle East ला नोकरी निमित्त स्थायिक झालो तेव्हा 'कडक चहा' च्या दुकानांवर चहाचे विविध प्रकार प्यायला मिळाले. दालचिनी आणि काळी मिरी वाला 'येमेनी' चहा जबरदस्त. Turkish रेस्टारंट मध्ये कोऱ्या चहात पुदिन्याचं पान घातलेला Turkish Tea देखील आवडला. इस्तंबूल (टर्की) ला तर चहा-कॉफी चे मोठे शौकीन आहेत. तिथल्या इस्तिकलाल स्ट्रीट वर तिथल्या स्पेशल कप-बशीत चहा पिणे एक सोहळा होतो. चहाला इतका मान देणारे 'चहा'ते बघून धन्यता वाटते.'हमेशा तुमको चहा' ह्या गाण्याचा गर्भितार्थ देवदासच्या आई ने लक्षात घेतला नाही. नाहीतर तिने पारो ला टाकण्याऐवजी पोराला 'चहा टाकला' असता. देवदास ला ब्लॅक लेबल ऐवजी (ब्रुक बॉण्ड) रेड लेबल चा नाद लागला असता. चहाची एवढी महती कळल्यावर एका अमृततुल्य बाहेर लिहिलेलं वाक्य मला अगदी पुरेपूर पटतं -'चहाला वेळ नसते, पण वेळेला चहा लागतो'= चहाबाज सरनौबत

(लेखक : **सरनौबत**)




# मेड इन चायना
# कोरोना लस जगासमोर

बिजींग, (वृत्तसंस्था) – जगात हाहाकार माजविणाऱ्या कोरोनाची महासाथ चीनमधून सुरु झाली. जगातील २०० देश याच्या विळख्यात सापडले आहेत. प्रत्येक देश या कोरोनावर लस आणण्याचा प्रयन्त करत आहे. चीनने या क्षेत्रातही बाजी मारली आहे. या लसीची किंमत भारतीय चलनात १० हजारच्या (१४६ अमेरिकन डॉलर ) घरात असण्याची शक्यता आहे. चीनने आता या आजाराच्या संसर्गावर बऱ्यापैकी नियंत्रण मिळवलं आहे. त्याचबरोबर चीनने सोमवारी पेइचिंग ट्रेड फेअरमध्ये करोना विषाणूवरील आपली पहिली लस जगासमोर सादर केली. चीनच्या या लसीची तिसऱ्या टप्प्यातील चाचणी अद्याप सुरु असून या वर्षाच्या शेवटी ही लस बाजारात दाखल होऊ शकते. चीनच्या सिनोवेक बायोटेक आणि सिनोफॉर्म या कंपन्यानी मिळून ही लस तयार केली आहे. सिनोवेक कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं की, ‘‘आमच्या कंपनीने सुरुवातीपासूनच ही लस तयार करण्यासाठी एक फॅक्टरी तयार केली आहे. या फॅक्टरीत दरवर्षी लसीचे ३०० मिलियन डोस बनवण्याची क्षमता आहे. पेईचिंग ट्रेड फेअरमध्ये चीनने सोमवारी ही लस सादर केली, यावेळी चीनने तयार केलेली पहिलीच लस पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. चीनने ज्या करोना विषाणूवरील लस सादर केली आहे. ही लस जगातील त्या १० लसींमध्ये समाविष्ट आहे जे आपल्या क्लिनिकल ट्रायलच्या शेवटच्या टप्प्यात आहेत. यावेळी जवळपास सर्वच देश करोना विषाणूच्या संक्रमणापासून बचावासाठी आणि आपली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे ज्यावेळी कोणतीही लस यशस्वी झाल्याचे सिद्ध होईल, त्या लसीलाच पहिल्यांदा मान्यता देण्यात येणार आहे. चीनवर जगभरात हा आजार पसरवल्याचा आरोप केला जात आहे. त्याचमुळे चीन आता करोना विषाणूची लस विकसित करण्यासाठी वेगाने पावलं उचलत आहे. दरम्यान, चीनने अंतिम चाचणीच्या आधीच लोकांना लसीचा डोस दिल्याच्या बातम्याही प्रसिद्ध झाल्या होत्या. चीनच्या राष्ट्रीय आरोग्य आयोगानं शनिवारी याबाबत खुलासा करताना सांगितलं होतं की, ते २२ जुलैपासूनच आपल्या नागरिकांना या लसीचा डोस देत आहेत.

# सरपंच निवडीचा अध्यादेश पंचायत राज व्यवस्थेचा मुडदा पाडणारा

मुंबई, – सरपंच निवडीचा हा अध्यादेश पंचायत राज व्यवस्थेचा मुडदा पाडणारा असल्याची टीका फडणवीस यांनी केली आहे.विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसाच्या कामकाजात मांडण्यात आलेल्या ३३ क्रमांकाच्या विधेयकास विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी हरकत घेतली आहे. सरपंच निवडीच्या या अध्यादेशाला औरंगाबाद खंडपीठ, नागपूर खंडपीठ व मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठानेही स्थगिती दिली आहे.त्यानंतर सरकारच्या विनंतीवरून तिन्ही याचिका एकत्र करून मुंबई खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली.त्यात राज्याच्या महाधिवक्त्यांनी सरकारच्या वतीने ॲफिडेविट दाखल करण्यात आले. सरकारच्या या अध्यादेशानुसार, राज्य शासनाला राजपत्रितातील अधिसूचनेद्वारे पंचायतीचा प्रशासन म्हणून योग्य व्यक्तीची नियुक्ती करता येईल, असे म्हटले आहे.योग्य व्यक्ती म्हणजे काय?संविधानाने यासंदर्भात स्पष्ट भूमिका सांगितली आहे, ती व्यक्ती लोकसेवक असला पाहजे. जो निवडून येतो तो लोकसेवक आहे, जो कर्मचारी आहे, तो लोकसेवक आहे. त्यामुळे कुठलीही व्यक्ती लोकसेवक होत नाही. म्हणून याविषयावर महाधिवक्त्यांनी चार व्यतिरिक्त व्यक्ती नेमणार नसल्याचे म्हटले आहे. त्यावर चारपेक्षा एखादा अधिक सरकारी कर्मचारी नेमण्यास न्यायालयाने परवानगी दिल्याचे फडणवीस यांनी सांगितले. तसेच हे विसंगत विधेयक आणणे चुकीचे असून आपला त्यास विरोध असल्याचेही ते म्हणाले. सरपंच निवडीचा अध्यादेश हा पंचायत राज व्यवस्थेचा मुडदा पाडणारा आहे. निवडून येतो तो किंवा जो शासकीय सेवेत तो लोकसेवक. या दोन व्यतिरिक्त दुसरा कुणी लोकसेवक होऊ शकत नाही. जे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, त्याचे विधेयक पारित करण्याची घाई क? असा सवाल फडणवीस यांनी केला आहे.

## शायरी



दिल की तरफ़ हिजाब-ए-तकल्लुफ़ उठा के देख,
आईना देख और ज़रा मुस्कुरा के देख !!

# मनपाचा कर्मचारीच बनला कोविड पथकाचा नोडल अधिकारी : भुतारे

अहमदनगर । महानगरपालिका हद्दीतील कोरोना नियंत्रण नोडल अधिकारी म्हणुन पालिकेच्या वेबसाईट वर आरोग्य विभागातील कर्मचारी बलभीम पठारे हे दिसत असुन हि व्यक्ती एक साधी कर्मचारी आहे. या व्यक्तीला साथरोगचा सुद्धा अनुभव नसुन हि व्यक्ती कुठल्याही प्रकारची डॉक्टर नाही तरी सुध्दा यांना नोडल अधिकारी का केले हा मोठा प्रश्न अहमदनगर शहरातील जनतेला पडलेला आहे. जो व्यक्ती डॉक्टर नाही त्याला कुठलाही अनुभव नसतांना त्यांना कोरोना आजरावर नियंत्रण तसेच, कोरोनावर नियंत्रणची सगळी जबाबदारी, मनपाने कोरोनाबाबत उपक्रम, त्याची देखरेख,अमलबजावणी, अहवाल, नियंत्रण ही जबाबदारी दिली जाते. त्यामुळे महापालिकेचा शहरातील जनतेच्या आरोग्याशी खेळ सुरुच असल्याचा सवाल मनसेचे नितीन भुतारे यांनी उपस्थित केला आहे.महापालिकेत १५ च्या जवळपास डॉक्टर काम करत असतांना एका कर्मचाऱ्याला अशी डॉक्टर लेवलची जबाबदारी का दिली गेली हि एक संशयास्पद आयुक्तांची भूमिका असून ज्या माणसाला साथीच्या रोगांची माहीती नाही त्याला कोरोना महामारी रोगामध्ये महापालिका नोडल अधिकारी म्हणुन जबाबदारी देते कशी? असा सवाल भुतारे यांनी उपस्थित केला आहे. असे अधिकारी पदावर माणसे नेमल्यामुळे अहमदनगर शहराची आरोग्य व्यवस्था कोलमडली असुन एका बाजुला व्हेंटिलेटर बेड रुग्णांना मिळत नाही. तर दुसरी कडे ताब्यातील दिपक हॉस्पिटल, एम्स हॉस्पिटल, सिव्हिल हॉस्पिटल मधील सर्व सोई सुविधा युक्त असलेले कोविड सेंटर मनपाच्या अकार्यक्षम माणसांमुळे बंध आहेत. हा सर्व प्रकार मनसेचे नितीन भुतारे यांनी मुख्यमंत्री व आरोग्य मंत्री तसेच पालकमंत्री यांना निवेदन पाठवुन उघडकीस आणला या सर्व प्रकाराला महानगर पालिकेचे आयुक्त व महानगर पालिकेचे आरोग्य अधिकारी जबाबदार असुन याच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे.महापालिकेला व शहराला सक्षम आयुक्तांची नेमणूक करावी अशी मागणी मनसेचे जिल्हा अध्यक्ष सचिन डफख, मनोज राऊत, ॲड. अनिता दिघे, गजेंद्र राशीनगर, विनोद काकडे यांच्यावतीने करण्यात आली आहे.

PARADISE
ART & DISPLAY
Auth.Distributors
ALKOSIGN®
WRITING & DISPLAY SYSTEMS
* WHITE BOARD
* PERFORATED BOARD
* ACRYLIC WORK
* NAME PLATES

HAJI IDREES SHAFI SHAIKH
9890524092 / 9028718302
1406-7,Mominpura,Sangamner,
Dist : Ahmednagar



अहमदनगर : कोरोना महामारीच्या पार्शवभूमीवर शहरातील विविध प्रभागात मनपाच्या आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेऊन चांगल्या आरोग्य सेवेसाठी महानगरपालिकेत ठिय्या आंदोलन करणारे नवनिर्वाचित काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांचा कोविड योद्धा म्हणून सत्कार करतांना दर्शकचे संपादक रियाझ शेख,काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते अनंत राव गारदे,एस एम आदिल, मोईन शेख

# आता कोरोना चाचणी आणखी स्वस्त
# खासगी प्रयोगशाळेत १२०० रुपये दर

कोरोनाची चाचणी आता आणखी स्वस्त झाली आहे. कोरोना चाचणीत ८०० ते ६०० रुपयांची कपात करण्यात आली आहे. कोरोनाच्या चाचणीसाठी आता जास्तीत जास्त दोन हजार रुपये मोजावे लागणार आहे. कोरोना चाचणीसाठी खासगी प्रयोगशाळेत स्वॅब दिल्यास १२०० रुपये आकारले जाणार आहेत. कोविड केअर सेंटर्स, हॉस्पिटल, क्लिनिक, क्वॉरंटाईन सेंटर्समध्ये स्वॅब दिल्यास १६०० रुपये आकारले जाणार आहेत. तर घरी येऊन स्वॅब घेतल्यास २००० रुपये आकारले जाणार आहेत. राज्य सरकारने कोरोना चाचणीचे नवीन सुधारित दर जाहीर केले आहेत. या नव्या िनर्ण यामुळे सर्वसामान्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. याआधी राज्यातील खासगी प्रयोगशाळांमध्ये केल्या जाणाऱ्या कोरोना टेस्टसाठी आता जास्तीत जास्त २८०० रुपये इतका दर आकारला जात होता. रुग्णाच्या घरी जाऊन स्वॅब घेतल्यास त्यासाठी २८०० रुपये इतका दर निश्चित करण्यात आला होता. तर प्रयोगशाळेत जाऊन स्वॅब दिल्यास २२०० रुपये दर निश्चित करण्यात आला होता. भारत जगातील काही मोजक्या देशांपैकी एक आहे, जिथे दररोज मोठ्या प्रमाणात कोविड चाचण्या केल्या जात आहे. आता देशाची दररोज चाचण्यांची क्षमता ११.७० लाखांच्या पुढे गेली आहे. भारतात आजवर झालेल्या एकूण चाचण्यांचा आकडा सुमारे पाच कोटी (४,९५,५१,५०७) इतका आहे. गेल्या १४ तासात देशात ७ लाख, २० हजार,६२ चाचण्या करण्यात आल्या. देशभरात चाचण्यांची गती आणि व्याप्ती वाढवल्यामुळे, केवळ गेल्या दोन आठवड्यात १कोटी, ३३ लाख, ३३ हजार, ९०४ चाचण्या करण्यात आल्या.

STAY HOME
STAY SAFE
WASH
HANDS
WEAR
MASK

साप्ताहिक दर्शक
e-mail - weeklydarshak@gmail.com
IF UNDELIVERED PLEASE RETURN TO DARSHAK
DARSHAK BHAVAN, 726,OPP.DEPALI THEATER ZENDIGATE, AHMEDNAGAR-414001 MAHARASHTRA
R.N.I. NO. MAH/MAR/2000/02266
POSTAL REGD.NO. ANR/068/2018-2020
TO,